## आरक्षण बाबत काँग्रेसचे आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २८ जून :** मागील दोन महिन्यापुर्वी झालेल्या ग्रा.पं. सरपंच पदाच्या आरक्षण सोडत मध्ये चिमूर तालुक्यातील आरक्षामध्ये ओ.बी.सी. ला वगळले होते. हे ओबीसी वर अन्याय आहे. या संदर्भामध्ये आक्षेप सुध्दा घेण्यात आला होता. चिमूर विधानसभा क्षेत्रातील व जिल्हयात ओबीसींवर अन्याय झाल्याची भावना तिव्र असल्यामुळे व सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे ओबीसींवर कोणत्याही तालुक्यात अन्याय होता कामा नये. त्यामूळे ग्रा.पं. आरक्षण सोडत ओबीसीसाठी नव्याने काढण्यात यावी. एस सी एस टी प्रवर्गातील आरक्षण कायम ठेवून ओबीसींना आरक्षण मिळाले पाहिजे अशी सुद्धा मागणी झाली.

## प्रियदर्शीनी विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २८ जून :** दि.२३ जुन २०२५ सोमवार रोजी श्री साईबाबा ग्रामीण विकास संस्था गडचिरोली द्वारा संचालित प्रियदर्शिनी कन्या विद्यालय, घुग्घूस येथे वर्ग ५वी ते ८वी च्या नवप्रवेशित विदयार्थीनींचे बैलगाडीतून आगमन करुन लेझीम व बॅन्ड पथकात, पुष्पवर्षा करुन स्वागत करण्यात करण्यात आले.याप्रसंगी अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याद्यापिका अनू चोथे तर प्रमुख पाहुणे म्हणून चिंतामणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय आसुटकर, डॉ मंगेश जमदाडे , समाजसेवक प्रेमलालजी पारधी, केंद्रप्रमुख दागमवार सर, श्रीमती रणदिवे मॅडम उपस्थित होते.

# रेती घाट धारकावर लवकरच कडक कारवाई होणार जिल्ह्यातील सर्वच वाळूघाटांवर अंतिम मुदत संपल्यानंतरही पोकलेनने उत्खनन

### महसुल मंत्र्याचे अपयश, रेती तस्करांना प्रोत्साहन, जनतेला फटका

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ जून :** जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील तहसीलदारांना पत्र देऊन दहा जून नंतर रेती घाटातून रेती उत्खनन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. मात्र जिल्ह्यात अजून पर्यंत एकाही रेती घाटावर उत्खनन करणाऱ्या रेती माफीयावर कारवाई केली नाही जेव्हा की सर्वच रेती घाटावर पोकलेन मशीनने रेती उत्खनन केले जात आहे. यामुळे महसुल विभाग रेती चोरी रोखण्यास पूर्णपणे अपयशी झाला आहे.

१० जून ही रेती उत्खननाची शेवटची तारीख होती. गोंडपिपरी उपविभागातील अंधारी आणि वर्धा नद्यांच्या पात्रामध्ये तस्कर खोदकाम करत आहेत. टीपीशिवाय वाळूची बेकायदेशीर विक्री होत आहे. घरकुलसाठी राखीव असलेली १० टक्के वाळू कुठे गेली? मंजूर परवानगीपेक्षा १० पट जास्त वाळू नदीकाठावरुन गोळा केली जात आहे, तरीही महसूल विभागाला माहिती नाही. जिल्ह्यातील नदीघाटांमधून नियमांचे पालन न करता वाळू उत्खनन केले जात आहे, त्यामुळे नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. १० जूननंतर वाळू उत्खनन थांबवण्याचे सरकारचे स्पष्ट आदेश होते, जे येथे उघडपणे उल्लंघन केले जात आहे. जिल्ह्यातील अनेक वाळूघाटांवर जेसीबी, पोकलेन सारख्या यंत्रांनी उत्खनन सुरू आहे, तरीही प्रशासन मूक दर्शक बनून आहे.

### नद्यांचे अस्तित्व धोक्यात

अत्याधुनिक यंत्रांनी नदीचे पात्र खोदल्यामुळे अनेक जलचर प्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. नद्यांच्या प्रवाहाची दिशाही बदललेली दिसते. पाण्याची पातळी कमी होत आहे. निसर्गचक्रात व्यत्यय आल्यामुळे पर्यावरणासह नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ईटीएस मशीनद्वारे मोजणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. गोंडपिपरीच्या वाळूघाटांवर सुरू असलेल्या अनियमिततेची माहिती मिळाल्यानंतर तहसीलदारांना चौकशीचे आदेश देण्यात आले होते, परंतु तहसीलदार जेव्हा जेव्हा वाळूघाटांना भेट देत असत तेव्हा त्यांनी अहवालात 'सर्व काही ठीक आहे' असे लिहिले होते. त्यांच्या अहवालांमध्ये लिहित आहे की घाटांवर नियमांनुसार वाळू उत्खनन केले जात आहे. परंतु, वास्तव असे आहे की घाटांवर परिस्थिती याच्या पूर्णपणे उलट आहे. नद्या आणि ओढ्यांच्या प्रवाहात पोकलेन, जेसीबी सारख्या यंत्रांचा वापर करून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात आहे. गोंडपिपरी उपविभागातील चेकलीखीतवाडा ढाबा आणि आर्वी घाट येथून पोकलेन यंत्रांद्वारे मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले. वर्धा नदीवरील आर्वी घाट ते तोहगाव लाठी-आवी या पुलाखाली दिवसरात्र खोदकाम सुरू होते, तरीही तहसीलदार मौन बाळगत आहेत. पावसाळ्यात हा कल्व्हर्ट वाहतुकीसाठी धोकादायक ठरू शकतो.

## ३० ला शहरात श्री जगन्नाथ रथयात्रेचा भव्य उत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ जून :** श्री कृष्ण कृपामूर्ती ए.सी. भक्तिवेदांत स्वामी श्रील प्रभुपाद यांनी स्थापन केलेल्या अंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) ने ३० जून रोजी दुपारी ३ वाजता चंद्रपूर शहरात श्री जगन्नाथ रथयात्रेचा भव्य, भक्तीपूर्ण आणि आध्यात्मिक उन्नती करणारा उत्सव आयोजित केला आहे. रथ आणि मूर्ती नागपूरहून रथयात्रे साठी येतील अशी माहिती इस्कॉन चंद्रपूरचे रमेश बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत दिली. बिराजदार म्हणाले की श्री जगन्नाथ रथयात्रा हा एक अतिशय पवित्र आणि भव्य उत्सव आहे, जो दरवर्षी १०० हून अधिक देशांमध्ये इस्कॉनद्वारे साजरा केला जातो. आता ही रथयात्रा चंद्रपूर शहरातही मोठ्या श्रद्धेने आणि भक्तीने आयोजित केली जात आहे. या दिव्य उत्सवात भगवान श्री जगन्नाथ, भगवान बलदेव आणि माता सुभद्रा मंदिरातून बाहेर पडतात आणि सर्व भाविकांना दर्शन देतात आणि आशीर्वाद देतात. या शुभ प्रसंगी, भक्तांना भगवान श्री जगन्नाथाच्या रथाची दोरी ओढण्याचा सौभाग्य देखील मिळत आहे. जे अत्यंत पुण्यपूर्ण मानले जाते. सोमवार ३० जून २०२५ रोजी दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत ही पवित्र रथयात्रा आयोजित केली जात आहे. रथयात्रेनंतर, सर्वांसाठी आरती, कथा आणि महाप्रसाद वाटप केले जाईल. ही रथयात्रा बंगाली कॅम्पमधील काली मंदिरापासून सुरू होऊन बस स्टँड, जटपुरा गेट, कस्तुरबा चौक, गिरनार चौक, गांधी चौक, जटपुरा गेट, पंचतेली हनुमान मंदिरात पोहोचेल. जिथे मिरवणूक संपेल. त्यानंतर महाप्रसाद वाटप केले जाईल.




# विदेशी मद्य निर्मीती मुल्यासह अखेर उत्पादन शुल्कात वाढ

### माल जुना, मात्र विक्रीचा नविन फामॅुला !



**रोखठोक**
**प्रा.महेश पानसे**

**अखेर** भारतीय बनावटीच्या विदेशी मद्य उत्पादन शुल्क दरात रातोरात वाढ करून राज्य शासनाने मद्यपींची झिंग उतरवलीच. २४ जूनला अधिसूचना काढून २५ जून २०२५ पासून अंमलबजावणीचे आदेश निर्गमीत करण्यात आले. या अधिसूचनेनुसार निर्मीती मुल्य दरात नवीन सूत्रानुसार भरमार वाढ होऊन त्यावरील वाढीव उत्पादन शुल्कामुळे मद्यपींना मोठा मुका आथिक मार बसणार आहे असे अधिसूचना निघताच जाणकारांचे मत दिसते. देशी दारूच्या उत्पादन शुल्कात वाढ केली नाही मात्र निर्मीती मूल्याचे सुत्र बदल करण्यात आल्याने देशी दारूच्या किमतीतही वाढ होऊन देशी सुद्धा काहीशी कडवट लागेल अशी चर्चा दिसते.

दारूच्या किमती वाढणार अशी चर्चा गत महिनाभरा पासून सुरू होतीच. किमती किती वाढतील याबाबत अनभिज्ञ असलेल्या मद्यपींना अपेक्षेपेक्षा मोठी खार खिशाला लागणार हे अधिसूचना बघून लक्षात येत असल्याचे बोलले जात आहे. विदेशी मद्याचे निर्मीती मुल्य बदलवून त्यावर उत्पादन शुल्क वाढ असा दुहेरी झटका मद्यपींना बसणार हे यावरून लक्षात येते. विशेष म्हणजे अधिसूचना निघताच रातोरात दरवाढीचा डाव बघता शासनास वसुलीची कमालीची घाई झाली का? हा खोचक सवाल उपस्थित होतो. एवढेच नव्हे तर सध्या स्टॉक मध्ये असलेल्या मालावर (जुन्या मालावर) नविन निर्मीती मुल्य सूत्रानुसार एम. आर. पी. लावण्यासाठी नविन किमतीचे शिक्के त्वरित मंजूर करून जुन्या बॉटल वरील किमती सुद्धा हातोहात बदलविण्यात येणार आहेत व तसे मंजुरीचे अधिकार संबधीत उपायुक्त, अधिक्षक यांना देण्यात आले आहेत.

### दरवाढीची लगबग कशाला ?

मालाची दरवाढ विवीध कारणांनी होणे अपेक्षित असते. उत्पादन खर्च वाढल्याने किंवा विवीध कर वाढल्याने किमती वाढतात. मात्र जुन्या मालावर त्या वेळच्या उत्पादन खर्चानुसार एम. आर. पी. ठरल्यानंतर तो माल निरस्त होईपर्यंत तरी त्यावर नविन सूत्रानुसार निर्मीती दर ठरविणे व जुन्या लेबल वर नविन किमतीचे शिक्के मारून भाववाढ करणे व लगेच किमतीने विक्री व त्यावर उत्पादन शुल्क वसुलीची सक्ती दि. २४ जुन २०२५ चे परिपत्रकानुसार करण्यात आल्याने एवढी लगबग कशाला? शाशनाला लाडक्या बहिणींचे मानधन मदयपींकडून वसूल करण्यात आलेल्या या शुल्कातून करण्याशिवाय दुसरा पयांय नाही का? असा कोपरखडीवजा सवाल '९०' मारून एखाद मदयपीने उपस्थित केल्यास नवल नाही अशी चर्चा सुरू झालेली दिसते.

स्टॉक असलेल्या जुन्या मालावरील एम. आर. पि. वर नविन एम. आर. पी. चे शिक्के मारून ३१ ऑगस्ट २०२५ पावेतो जुना माल संपवायचे आदेश देण्यात आले आहेत. विदेशी मद्याचे भाव वाढविण्यासाठी नविन निर्मीती दर सुत्र व त्यावर वाढीव उत्पादन शुल्क वसूल होणार असले व ते शासन धोरणानुसार असले तरी मात्र जुन्या मालावर नविन निर्मीती दर सूत्रानुसार एम. आर. पी. घेण्याकरिता शिक्के मारून किमतीत छेडछाड करणे नैतिकतेला धरून राहील का? असाही सवाल उपस्थित होऊ लागला आहे.

चंद्रपूर जिल्ह्याचा विचार केल्यास विदेशी मद्याचे स्टॉकिष्ट मोठे आसामी आहेत. यात विदेशी व देशी स्टॉकिष्ट मध्ये दोन आमदारांचा समावेश (पाटॅनरशिप)असल्याचे बोलले जाते. जाणकारांचे मते यांचेकडे विदेशी मद्याच्या अंदाजे ५० हजारावर पेटया जुना माल असेल. याशिवाय बियरबार,वाईन शॉप मध्ये शिलुक जुना साठा बघितल्यास एम. आर. पी. वर नविन मुल्याचे शिक्के मारुन उत्पादन शुल्क रूपात फार मोठी खिचाई मदयपींकडून होणार हे नक्की.

# नकोडा येथे समाज भवन भुमीपूजन समारंभ सोहळा



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २८ जून :** घुग्घुस येथुन तीन किलोमीटरवर अंतरावर असलेले मौजा-नकोडा येथील वार्ड क्र. ५ येथे समाज भवन बांधकाम करण्यात येत आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमीपुजन करण्यात आले.

यावेळी अनेक महिलांनी, नागरिकांनी आ.किशोर जोरगेवार यांच्या मार्गदर्शनात भाजप पक्षात प्रवेश केला.

यावेळी पक्ष मजबूत करून विविध समस्यांबाबत बाबत चर्चा करण्यात आले.

याप्रसंगी भाजप नेते आशिष मासिरकर,नामदेव डाऊले,इमरान खान, नवीन मोरे,सुरज मोरपाका, नकोडा ग्रामपंचायत सदस्या ममता मोरे व भाजप पदाधिकारी,गावकरी आदी उपस्थित होते.

# डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी पुण्यतिथी निमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभुर्णा, दि. २८ जून :** डॉ.श्यामाप्रसाद वाचनालय येथे आ. सुधीर भाऊ मुनगंटीवार यांचे मार्गदर्शनांमध्ये डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथी निमित्याने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व अभ्यासिकेत मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी ठाणेदार राजकमल वाघमारे उपस्थित होते.

प्रथम डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे प्रतिमेला माल्यार्पण करून तालुक्यातील १० वी आणि १२ वी तील गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी इयत्ता बारावी मध्ये तालुक्यातून कृष्णाई कोहळे जनता कनिष्ठ महाविद्यालय पोंभुर्णा ही प्रथम तर साहिल निमसरकार द्वितीय जनता कनिष्ठ महाविद्यालय पोंभुर्णा, यश चांदेकर तृतीय श्रीकृष्ण सायन्स महाविद्यालय पोंभुर्णा यांना शिल्ड देऊन गौरव करण्यात आले. तसेच इयत्ता दहावी मध्ये तालुक्यातून प्रथम यश खोब्रागडे जनता विद्यालय पोंभुर्णा तर द्वितीय अनिकेत मडावी गंगाराम नाईक आश्रम शाळा आंबेधानोरा आणि तृतीय निशांत बोबाटे जनता विद्यालय पोंभुर्णा शिल्ड देऊन गौरव करण्यात आले.



श्यामा प्रसाद मुखर्जी वाचनालयातील विद्यार्थी अनिकेत इप्पलवार याने CET परीक्षेत यश मिळविल्या बद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला.

सत्कार कार्यक्रमाचा उद्देश एकच वर्षातून एकदा अधिकारी यांचे मार्गदर्शन आणि त्याच अभ्यासिकेत यश प्राप्त केलेल्या विध्यार्थी यांचा सन्मान केल्याने त्यांना प्रोत्साहन मिळेल. उपस्थित विद्यार्थी त्यांच्या पालकांसहित पुष्पगुच्छ शिल्ड आणि भेट वस्तू देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ठाणेदार राजकमल वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबद्दल मोलाचं मार्गदर्शन करतांना त्यातील काही बारकावे स्पष्टपणे समजावून सांगितले. सोबतच अल्का आत्राम यांनी मेहनत हेच यशाचे सूत्र असल्याचे सांगत अभिनंदन आणि शुभेच्छा दिल्या व अभ्यासिकेतील विद्यार्थी सुद्धा येणाऱ्या काळात यश गाठतील ही अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी अल्का आत्राम प्रदेश महामंत्री, विनोद देशमुख माजी उपसभापती, राजू मोरे महामंत्री,अजय मस्के युवा मोर्चा अध्यक्ष, दिलीप म्यॅकलवार, रवी गेडाम, रोशन ठेंगणे,नैलेश चिचोलकर, राकेश गव्हारे मोहन चलाख, रजिया कुरेशी, सुनीता म्यॅकलवार, हंसा मेश्राम, महेंद्र सोनुले,शिवम ओदेलवार आदींची उपस्थित होते.

# म्हातारदेवी येथील गावकऱ्यांनी केला आ.किशोर जोरगेवार यांचा सत्कार




**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २८ जून :** घुग्घुस येथून दोन किलोमीटर अंतरावर असलेले म्हातारदेवी येथे दि. २७ जुन २०२५ शुक्रवार रोजी सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व गावकरी नागरिकांनी आमदार किशोर जोरगेवार यांचे शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच भाजप नेते आशिष मासीरकर, नामदेव डाऊले, भोयर, ठेंगणे व संतोष ढेंगळे यांच्यापण शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुण सत्कार करण्यात आले. यावेळी आ.किशोर जोरगेवार म्हणाले की रस्ते,नाली,असा अनेक प्रकारच्या विविध समस्या या गावांतील सोडविणार असे नागरिकांना सांगण्यात आले.

याप्रसंगी गावातील नागरीक व भाजपचे पदाधिकारी,कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात बोनस जमा होण्यास सुरूवात

### प्रती हेक्टर वीस हजारांचा बोनस मिळावा यासाठी केले होते प्रयत्न, आ. मुनगंटीवार यांच्यामुळे पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांच्या खात्यात ९४ कोटी रुपयांचा बोनस जमा होण्यास झाली सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ जून :** शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव अग्रेसर असलेले राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात बोनस जमा होण्यास सुरूवात झाली आहे. यामुळे,चंद्रपूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.



खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत सहभागी झालेल्या नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. पहिल्या टप्प्यात चंद्रपूर जिल्ह्यातील पणन अधिकारी विभागाकडे ६९ कोटी रूपये तर आदिवासी विकास महामंडळाकडे २५ कोटी रूपये धान बोनस जमा झालेला असुन पाहिल्या टप्प्यातील एकूण ९४ कोटी रूपये शेतकऱ्यांच्या थेट पैसे खात्यात धानाच बोनस जमा होण्याची सुरुवात झालेली आहे. उर्वरित सर्व शेतकऱ्यांना लवकरच बोनस मिळणार आहे.यासाठी चंद्रपूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आ. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

राज्य शासनाने धान लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्रानुसार, प्रती हेक्टर वीस हजार रुपयांचा प्रोत्साहनपर बोनस देण्याचा शेतकऱ्यांना द्यावा, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत रेटून धरली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य सरकारने यासंदर्भात निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.

विशेष म्हणजे, नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी धान विक्री केली असो वा नसो, तरीही शेतकऱ्यांना ही प्रोत्साहनपर रक्कम दोन हेक्टरच्या मर्यादेत दिली जावी, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली होती. ती देखील राज्य शासनाने मान्य करून तसा निर्णय जाहीर केला होता.

या निर्णयामागे आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विधानसभेतील मागणी महत्त्वाची ठरली. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अन्न व नागरी पुरवठा विभागाने २५ मार्च रोजी शासन निर्णय निर्गमित केला होता आणि आता शेतकऱ्यांच्या खात्यात हा बोनस जमा होण्याची सुरुवात झाली आहे. राज्यभरातील धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये या निर्णयामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांचे शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

### मुख्यमंत्र्यांसोबत केली होती चर्चा

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चर्चा केली होती. धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस मिळाला तर शेतकऱ्यांचे मनोबल वाढेल, याकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला आणि आता शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष बोनस देखील जमा होण्याची सुरूवात झाली आहे.

### कायम शेतकऱ्यांप्रती संवेदनशील

आ.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची विक्रमी २०२ कोटीची रक्कम मिळू शकली होती. यापूर्वीही धानाच्या बोनससाठी पाठपुरावा करत बोनस मिळवून दिला होता. शेतकऱ्यांप्रती आ. मुनगंटीवार सदैव संवेदनशील असतात, हे विशेष.

# न्यू ब्राईट कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटला आमदार देवराव भोंगळे यांची भेट

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २८ जून :** राजुरा शहरातील नामांकित कॅम्पुटर इन्स्टिट्यूट म्हणून प्रसिद्ध असलेले न्यू ब्राईट कम्प्युटर कर्नल चौक राजुरा येथे आमदार देवराव भोंगळे यांनी भेट देत इन्स्टिट्यूटचे संचालक फारूक शेख यांच्यासोबत विविध विषयावर दिलखुलास चर्चा केली.

पहिल्यांदाच आमदार देवराव भोंगळे यांनी शहरातील कर्नल चौक येथे असलेल्या न्यू ब्राईट कम्प्युटर येथे भेट देऊन इन्स्टिट्यूट बद्दल व इन्स्टिट्यूटच्या कार्याची माहिती जाणून घेत, त्या ठिकाणी सुरू असलेल्या विविध कोर्स संबंधी माहिती व याठिकाणी केल्या जाणाऱ्या कामाची माहिती जाणून घेतली. यावेळी नुकतेच न्यू ब्राईट कम्प्युटर इन्स्टिट्यूटला कॉम्पुटर टायपिंगची मान्यता मिळाली असून या कोर्सला सुद्धा आमदार देवराव भोंगळे यांनी भविष्यात न्यू ब्राईट कम्प्युटर इन्स्टिट्यूट एक राजुरा विधानसभा क्षेत्रात नावाजलेले इन्स्टिट्यूट आणि जनतेची सेवा करणारे इन्स्टिट्यूट म्हणून समोर येण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहे. यावेळी आमदार देवराव भोंगळे यांचे स्वागत इन्स्टिट्यूट चे संचालक फारुक शेख, स्टाफ मॅनेजर शोएब शेख कर्मचारी अलिशा मॅडम, निशा मॅडम, भरती मॅडम व इतर सहकाऱ्यांनी आमदार देवराव भोंगळे यांचे पुष्पगुच्छ देत स्वागत केले



यावेळी कामानिमित्त आलेले ग्रामीण भागातील व शहरातील नागरिक, समृद्धी नागरी सहकारी पतसंस्थेचे सचिव मसूद अहमद, राजुरा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्राध्यापक बी यु बोर्ड, राजुरा पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण गोरे, आनंद चलाक, सागर भटपल्लीवार यांची उपस्थिती होती.

## शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २८ जून :** जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे नविन शैक्षणिक सत्र उन्हाळी सुट्टीनंतर (दि. २३) सुरु झाले असून शाळेचा पहिला दिवस असल्याने नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत शाळेच्या प्रवेश द्वारावर गुलाबपुष्प, गोड पदार्थ देत केल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंद व नवचैतन्य दिसून येत होते. विदर्भातील तापमान जास्त असल्याने विदर्भातील शाळा राज्यात उशिरा सुरु होत असते. प्रथमच विदर्भातील शाळा २३ जून रोजी सुरु होत असून विद्यार्थ्यांना पोषक आंनदी वातावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येक शाळेत प्रवेशोत्सव साजरा केला .

## गो.वा. महाविद्यालयात योग दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २८ जून :** येथील गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या सभागृहात योग दिन साजरा करण्यात आला . २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येते, बदलत्या जीवनशैलीत योग व प्राणायमाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. मानवी जीवनात योग व प्राणायाम महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. सुदृढ व बलवान शरीर योग व प्राणायामामुळेच निर्माण होण्यास मदत होत असल्याने महाविद्यालयात ताडासन, भुजंगासन, अनुलोम-विलोम, भ्रामरी, सूर्य नमस्कार आदींचे प्रात्यक्षिक करून सर्वांना धडे दिले आहेत.

# ग्रामीण भागाचे सर्वसमावेशक विकासाचे ध्येय गाठण्यासाठी विकासकामांबरोबर शिक्षण, आरोग्य सुविधांना केंद्रस्थानी ठेवा - आ. किशोर जोरगेवार

### जिल्हा परिषद येथे बैठकीचे आयोजन, सर्व विभागांच्या कामांचा आढावा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ जून :** ग्रामीण भागाचा खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास साधायचा असेल तर केवळ रस्ते, पूल, पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांवर भर देणे पुरेसे नाही, तर शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजांना केंद्रस्थानी ठेवून नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामस्थांच्या गरजा समजून घेत त्यानुसार विकासाचे काम करा, असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा परिषदेत आयोजित आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिले.



आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा परिषदेच्या बैठक सभागृहात सर्व विभागांची आढावा बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, भा.प्र.से., उपमुख्य कार्यकारी अधिकारी नूतन सावंत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रमोद जल्लेवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास विभाग) भागवत तांबे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप बाराहाते, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप बाराहाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी संदीप खंबाईत, जिल्हा समाजकल्याण अधिकारी धनंजय साळवे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मगरोहमयो) उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक आशुतोष सपकाळ, प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रतिनिधी विशाल देशमुख, पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी लक्ष्मी कुमरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सहायक प्रकल्प अधिकारी कांचन वरठी, सहायक गटविकास अधिकारी (पंचायत विभाग) संजय नैताम, पशुधन विकास अधिकारी डॉ. विनोद रामटेके, बालविकास प्रकल्प अधिकारी आरती जगताप, उपअभियंता (तांत्रिक) निलेश मानकर, कृषी विभागाचे जयंत धात्रक आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा परिषदेमध्ये आयोजित आढावा बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी सर्व विभाग प्रमुखांसोबत जिल्ह्यातील विकास योजनांची सविस्तर चर्चा केली. आमदार जोरगेवार यांनी बैठकीत सांगितले की, गावातील मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. शाळांमध्ये मूलभूत सुविधा, शिक्षकांची भरती, गुणवत्तापूर्ण शिक्षण यावर प्राधान्य दिले पाहिजे. तसेच ग्रामीण भागातील रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे याठिकाणी डॉक्टर, औषधे, उपचार सुविधा वेळेत उपलब्ध होण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

पांदण रस्त्यांकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहनही आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. शेतकऱ्यांना शेतीच्या शिवारांपर्यंत जाण्यासाठी पांदण रस्त्यांची मोठी गरज असते. त्यामुळे अशा रस्त्यांची कामे दर्जेदार आणि वेगाने करण्याचे नियोजन करण्याची सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाला प्रलंबित रस्ते आणि पुलांच्या कामांची माहिती घेऊन त्याची प्रगती तातडीने करण्याचे निर्देश दिले. ग्रामविकास निधीचा योग्य वापर करून गावातील गरजांनुसार कामे हाती घ्या आणि त्यात पारदर्शकता ठेवा, अशीही सूचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली.

# आता राजुरात दोन दिवसा ऐवजी पाच दिवस खरेदी-विक्रीची कामे

### आमदार देवराव भोंगळे यांनी घेतली नागरिकांच्या मागणीची दखल;दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालयातील प्रकार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २८ जून :** तहसील कार्यालय राजुरा येथे असलेल्या दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालयातील दुय्यम निबंधक यांच्याकडे कोरपना तालुक्याचा अतिरिक्त प्रभात राहत असल्यामुळे मोठ्याप्रमाणात खरेदी - विक्रीचे व्यवहार होणाऱ्या राजुरा सारख्या तालुक्यात फक्त दोन दिवस खरेदी - विक्रीचे व्यवहार चालायचे यामुळे बाहेर गावावरून येणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास व्हायचा. कधी आल्यापावली परत जावे लागायचे. मात्र ही समस्या नागरिकांनी आमदार देवराव भोंगळे यांच्या अनिदर्शनात आणून देताच आमदार भोंगळे यांनी दोन दिवस सुरु असणारी खरेदी - विक्रीची कामे आठवडाभर म्हणजे पाच दिवस सुरु झाल्याने नागरिकांनी आमदार भोंगळे यांचे आभार मानले.

राजुरा तालुका हा विविध नैसर्गिक साधन समृद्धीने नातलेला आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात



औद्योगिक उद्योग असल्याने उदयोगासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीची खरेदी विक्री, त्यासोबतच इतर मालमत्तेची खरेदी-विक्री, भाडे करार, मृत्युपत्र आणि इतर कायदेशीर दस्तांची नोंदणी करन्यासाठी नगारीक मोठ्या प्रमाणात तालुक्याच्या ठिकाणी येत होते. परंतु खरेदी - विक्रीची कामे आठवड्यातील मंगळवार व गुरुवार फक्त दोनच दिवस राहत होते. यामुळे कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी असायची. कधी लिंक नसायची तर कधी तांत्रिक अडचण आली म्हणून जिल्ह्यातून, जिल्ह्याच्या बाहेर ठिकाणावरून आलेल्या नागरिकांना परत जावे लागायचे. पुन्हा दिवस पाहूनच कामासाठी यावे लागत होते. हा त्रास मागील अनेक वर्षांपासून सुरु होता. मात्र नागरिकांनी आमदार भोंगळे यांच्या निदर्शनात आणून देताच एक फोन करून ही समस्या दूर केली असून नागरिकांनी आमदार देवराव भोंगळे यांचे आभार मानले आहे.

या कार्यालयातून नोंदणीकृत दस्तांची देखभाल करणे, मालमत्तेचे खरेदी-विक्रीचे करार, भाडेकरार, मृत्युपत्र, दानपत्र, इत्यादी दस्तांची नोंदणी करणे. नोंदणीकृत दस्तांचे रेकॉर्ड व्यवस्थितपणे जतन करणे आणि गरज पडल्यास दुरुस्ती करणे. अपील आणि याचिकांवर कार्यवाही अपील, याचिका आणि अर्जांची नोंदणी करणे आणि त्यावर कार्यवाही करणे, नोंदणीकृत दस्तांमध्ये काही त्रुटी असल्यास, त्या दुरुस्त करण्याची परवानगी देणे. मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क जमा करणे. नागरिकांना दस्तांची नोंदणी आणि इतर संबंधित कामांसाठी माहिती देणे. दुय्यम निबंधक कार्यालयासंबंधी तक्रारींचे निवारण करणे. शासनाने सोपवलेली इतर कामे पार पाडण्याचे काम करावे लागत असते. परंतु कार्यालयात दुय्यम निबंधकच जागेवर हजर राहत नसल्याने याचा नागरिकांना मोठा त्रास होत होता.

# तिरुपती अर्बन कोऑप बँक लिमिटेडच्या चंद्रपूर शाखेच्या स्थलांतरित नवीन जागेचे उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ जून :** तिरुपती अर्बन कोऑप बँक लिमिटेडच्या चंद्रपूर शाखेच्या स्थलांतरित नवीन जागेचा उद्घाटन समारंभ २२ जून २०२५ रोजी महाराष्ट्र सरकारचे आमदार आणि माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार जी यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमात आ. सुधीर मुनगंटीवार यांचे पारंपारिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

या प्रसंगी बँकेचे अध्यक्ष प्रेम ग्रोव्हर, उपाध्यक्ष रमेश बोरकुटे, संचालक रघुनाथ मलिकर, शकील सत्तार, राजू लोहे, पालक संचालक प्रणव आडे आणि सीईओ संजय बाणेर्जी यांच्या उपस्थितीत सुधीर मुनगंटीवार यांनी रिबन कापून दीपप्रज्वलन केले.

आ. सुधीर मुनगंटीवार जी यांनी त्यांच्या काळातील सवोत्तम अर्थमंत्री म्हणून आपला अनुभव सांगितला. मध्यमवर्गीय आणि लहान विक्रेते/किरकोळ विक्रेत्यांना लहान आणि परवडणाऱ्या बँक वित्त पुरवठा आणि इतर आकर्षक उत्पादनांद्वारे समाजाच्या उन्नतीसाठी तिरुपती बँकेच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले आणि लवकरच महाराष्ट्र राज्यातील टॉप ५ बँकांमध्ये बँकेचा समावेश व्हावा यासाठी शुभेच्छा दिल्या.

# घरासमोरील उभे असलेले ट्रॅक्टरचे सामान चोरणाऱ्याला भद्रावती पोलिसांनी केली अटक

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २८ जून :** दि ३० एप्रिल ला भद्रावती शहरातील फुकट नगर येथे घरासोमारील उभे असलेले ट्रॅक्टरचे स्पेअर पार्ट सामान अज्ञात इसमांनी चोरी केल्याची घटना घडली. फिर्यादी ने अज्ञात इसमाविरुद्ध दि- १ मे रोजी भद्रावती पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी चोरट्याचा शोध घेत दि २७ जून ला फुकट नगर येथून आरोपीला अटक केली आहे.



फुकट नगर येथील भारत गजानन नागपुरे आपल्या शेतीच्या कामावरून परत येऊन ट्रॅक्टर क्र एम एच ३४ बी जि ०२७१ असून आपली घरासमोर उभी केली. मात्र दुसऱ्या दिवशी ट्रॅक्टर सुरु केले असता ते सुरु न झाल्याने शंका होताच त्यांना स्टार्टर सेल्फ, बॅटरी, लोखंडी पट्टा , लोखंडी रोडवेटरचे पट्टे आणि स्पेअर पार्ट आढळले नाही. ते चोरी गेल्याची तक्रार नागपुरे यांनी भद्रावती पोलिसात केली.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर आरोपी सुरज उर्फ गोलू किन्नाके वय २५ वर्ष रा फुकट नगर, भद्रावती यांचेवर शंका होताच विचारपूस केली असता त्याचे कडून चोरी गेलेले स्टार्टर सेल्फ, बॅटरी, लोखंडी पट्टा , लोखंडी रोडवेटरचे पट्टे आणि स्पेअर पार्ट मिडून आल्याने त्याच्याविरुद्ध १९७/२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ४७९०० रु चा माल ताब्यात घेऊन आरोपी सुरज उर्फ गोलू किन्नाके याला अटक करण्यात आली आहे. हि कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी, नयोमी साठम, नवनियुक्त भद्रावती पोलीस निरीक्षक योगेश्वर पारधी, गुन्हे शोध पथकाचे पो उप नि गजानन तुपकर, महेंद्र बेसरकर , जगदीश झाडे, योगेश घाटोडे , अनुप आष्टुनकर, विश्वनाथ चुदरी, खुशाल कावळे यांनी केली आहे.

# गडचिरोली चकमकीतील शौर्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांना राष्ट्रपती शौर्य पदक प्रदान



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. २८ जून :** गडचिरोली जिल्ह्यातील नारकसा जंगल परिसरात दिनांक १९ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या पोलीस-नक्षलवादी चकमकीत उल्लेखनीय शौर्य दाखविल्याबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश देवराम पाटील यांना दिनांक २६ जून २०२५ रोजी राष्ट्रपतींचे पोलीस शौर्य पदक (PMG) प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन, मुंबई येथे आयोजित पद अलंकरण समारंभात हे पदक प्रदान करण्यात आले.

१५सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या या चकमकीत, पोलीस सी-६० कमांडो पथकाचे नेतृत्व करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश पाटील यांनी दोन नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात मोलाची भूमिका बजावली होती. त्यांच्या या साहसी कामगिरीची दखल घेत भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०२१ रोजी त्यांना राष्ट्रपतींचे पोलीस शौर्य पदक जाहीर केले होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश देवराम पाटील यांना त्यांच्या पोलीस खात्यातील विशिष्ट कामगिरीसाठी शासनाने सन २०२१ मध्ये पोलीस उपनिरीक्षक या पदावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी वेगवर्धित पदोन्नती दिली आहे.

याव्यतिरिक्त, त्यांना यापूर्वी विशेष व खडतर सेवा पदक, आंतरिक सुरक्षा पदक आणि पोलीस महासंचालक पदक यांसारख्या विविध पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे.

सध्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश पाटील हे घुगघूस पोलीस ठाणे येथे कार्यरत आहेत. त्यांच्या या शौर्य पदकामुळे पोलीस दलाचे मनोधैर्य वाढले असून, त्यांच्या अतुलनीय सेवेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चंद्रपूर जिल्हा स्केटिंग असोसिएशन तर्फे स्केटिंग स्पर्धा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ :** चंद्रपूर जिल्हा स्केटिंग असोसिएशन तर्फे २२ जून रोजी पोलीस ग्राउंड येथे स्केटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाला जिल्ह्याचे डी वाय एस पी प्रमोद चौगुले, ए पी आय अतुल थुल,प्रवीण जाधव , योगेश खरसन प्रमुख अथिती म्हणून उपस्थित होते. सदर स्केटिंग स्पर्धेमध्ये १ ते १४ वर्षावरील आणि १६ वर्षावरील अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला. सर्व विजेत्या स्पर्धकाना मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. तसेच सदर स्पर्धेकरिता पालक वर्गही उत्साही होते. स्केटिंग स्पर्धेच्या यशस्वितेकरिता चंद्रपूर स्केटिंग असोसिएशन च्या अध्यक्ष श्रीमती रमा गर्ग, उपाध्यक्ष श्री. राकेश तिवारी, सचिव श्री. प्रवीण चवरे, श्री. विनोद निखाडे, श्री. हेमंत घिवे, श्री. अनुप पॉल, केतन बेले, सुरज धोपटे, नगराळे सर, सुरज बावणे, पवन घाडगे, रोशन गजभिये, अरविंद बुरडकर, सुरेंद्र बुरडकर प्रशांत सलगर यांनी अथक परिश्रम घेतले.

# पत्नीच्या तक्रारी वरून पतीसह तिघांवर गुन्हा दाखल




**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २८ जून :** राजुरा पत्नीच्या तक्रारी वरून पतीसह तिघांवर राजुरा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला पोलिसाकडून प्राप्त माहिती नुसार रश्मी देबटवार वय ३३ यांच्या तक्रारी वरून पती राजेश्वर देबटवार, महेश देबटवार, लीला देबटवार, नीता देबटवार यांच्या विरुद्ध राजुरा पोलीस स्टेशन मध्ये भारतीय न्याय संहिता अन्वये कलम २९६,११५ (२),३५१ (२) चार व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रश्मी देबटवार यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, धोपटाला येथील कृष्णा नथानी यांच्या किराणा दुकानात किराणा सामान घेऊन देण्यासाठी मुलांनी फोन केला असता अश्लील शिवीगाळ करून तीनही मुलाना मारहाण केली आणि या पुढे घरी दिसले तर मारल्याशिवाय सोडणार नाही अशी धमकी दिली अश्या तक्रारी वरून राजुरा पोलिसांनी कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे पत्रकार परिषदेत पत्नीचा आरोप पती राजेश्वर देबटवार माझ्या तीन मुलांना मारण्याच्या धमक्या देत आहे. मला किराणा घेऊन देण्यास तयार नाही. मी सोडचिट्टी देणार नाही. मला माझा पत्नीचा हक्क प्राप्त झाला पाहिजे. मला हक्क न प्राप्त झाल्यास न्यालयात दाद मागू असे पत्रकार परिषदेत सांगितले. या प्रसंगी रश्मी देबटवार, मुले हर्षल देबटवार वय १६,पृथ्वीराज देबटवार वय १३, ओम देबटवार वय ८ उपस्थित होते.पुढील तपास राजुराचे ठाणेदार सुमित परतेकी करीत आहे.

# जिल्हा बँक निवडणुकीत २३ उमेदवारांमध्ये सात जागांसाठी निवडणूक

### विजय वडेट्टीवार, किशोर जोरगेवारांची माघार, धानोरकरांसह १३ संचालक अविरोध

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालकपदाच्या निवडणुकीत खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यासह तब्बल १३ संचालक अविरोध निवडून आले. आमदार विजय वडेट्टीवार व आमदार किशोर जोरगेवार यांच्यासह ११३ उमेदवारांनी शुक्रवारी (दि. २७) निवडणुकीच्या मैदानातून माघार घेतली. आता केवळ सात संचालकांसाठी २३ उमेदवारांमध्ये निवडणूक होणार आहे. विशेष म्हणजे अ गटातून सहकारी क्षेत्रातील सर्वाधिक १० दिग्गज उमेदवारांनी आपली पकड कायम ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदांसाठी २१३ नामांकन दाखल झाले होते. छाननीनंतर १५५ नामांकन पात्र ठरले होते. पैकी सहा जण न्यायालयातून अपात्र ठरले. ११३ जणांनी माघार घेतल्याने निवडूणक रिंगणात २३ उमेदवार उरले आहे.

बँकेच्या निवडणुकीत इतिहासात पहिल्यांदाच एक खासदार, दोन आमदार व एका माजी आमदाराने नामांकन दाखल केल्याने राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषयाचा झाला. दरम्यान, सात उमेदवारांच्या नामांकनाविरोधात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात तसेच विभागीय उपनिबंधकांकडे धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाने सात



उमेदवारांचे नामांकन पात्र ठरविले. शुक्रवारी (दि. २७) नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता.

यावेळी आमदार विजय वडेट्टीवार यांनी सिंदेवाही अ गटातून आणि आमदार किशोर जोरगेवार यांनी गट ब २ तसेच अनुसूचित जाती गटातून निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. गोंडपिपरीत उल्हास करपे व अमर बोडलावार यांचे नामांकन रद्द झाले. या गटात उमेदवारच रिंगणात नाही. १३उमेदवारांची अंतिम यादी ३० जून रोजी जाहीर होईल. १० जुलैला मतदान व ११ जुलैला मतमोजणी व निकाल जाहीर होणार आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत १३ जण अविरोध निवडून आले. यामध्ये सहाजण भाजपचे असल्याचा दावा केला जात आहे. उमेदवारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी झाल्या. जिल्हा बँकेत आघाडीबाबत बरीच राजकीय खलबते झाली. यामध्ये नेमके काय घडले, यावर कुणीही भाष्य केले नाही. या बैठकीत खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार बंटी भांगडिया, माजी आमदार सुभाष धोटे, संतोषसिंह रावत यांच्यासह आजी-माजी संचालक उपस्थित होते. यावेळी आघाडीवरून चांगलीच रस्सीखेच झाल्याची माहिती आहे. नऊ जागांवर आपले संचालक अविरोध निवडून आल्याचा दावा रावत गटाकडून करीत आहे.

### अविरोध ठरलेले संचालक

खासदार प्रतिभा धानोरकर, माजी अध्यक्ष संतोषसिंह रावत, रविंद्र शिंदे, संदीप गड्डमवार, संजय डोंगरे, डॉ. अनिल वाढई, गणेश तर्वेकर, आवेश पठाण, नागेश्वर ठेंगणे, विलास मोगरकर, नंदा अल्लूरवार, शेखर धोटे, दामोदर मिसार आदी एकूण १३ उमेदवार संचालकपदी अविरोध ठरले आहेत.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

